रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ, मुंबई या कार्यालयातील लघुलेखक या पदाच्या मानधनात वाढ करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसपीबी-२०१९/प्र.क्र.३४/सां.का.१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक: १ ऑगस्ट, २०१९

<u>संदर्भ :</u> १) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्र.संकीर्ण-२००१/प्र.क्र.२९८/सां.का.१, दि.२३ मार्च, २००६
२) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्र.आस्था-२००६/प्र.क्र.२०९/सां.का.१, दि.१७ मार्च, २००७
३) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र.एसपीबी-२०११/प्र.क्र.१८/सां.का.१, दि.१५ डिसेंबर, २०११

<u>प्रस्तावना</u> :

रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाच्या कार्यालयात करार पध्दतीने कार्यरत असलेल्या लघुलेखक या पदास उपर्निर्दिष्ट दि.१५ डिसेंबर, २०११ च्या शासन निर्णयानुसार दरमहा रु.१०,०००/- इतके मानधन देण्यात येते. मंडळाच्या कामकाजाचे स्वरुप व महागाई विचारात घेता लघुलेखक पदाच्या मानधनात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

शासन निर्णयान्वये रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाच्या कार्यालयात करार पध्दतीने कार्यरत असलेल्या लघुलेखक या पदाच्या मानधनात रुपये १०,०००/- ने वाढ करुन ते या शासन निर्णयाच्या दिनांकापासून दरमहा रु.२०,०००/- (रुपये वीस हजार मात्र) इतके करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. यासाठी होणारा खर्च मागणी क्र.झेडडी-२, २२०५ कला व संस्कृती (००) ००१, संचालन व प्रशासन (०२) (०१) राज्य रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षक मंडळाचे कार्यालय (२२०५ १३८३), १३ कार्यालयीन खर्च या लेखाशिर्षाखाली त्या त्या वर्षी मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतुन भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.१८०/२०१९/व्यय-१५, दि.०९.०७.२०१९ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र.२०१९०८०११७०४१६००२३ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Vilas Ramrao Thorat
Date: 2019.08.02 17:12:14 +05'30'

(विलास रा. थोरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
२. उप सचिव (सांस्कृतिक कार्य) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
३. सचिव, रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ, मुंबई
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
५. महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
७. महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१०.वित्त विभाग (व्यय-१५), मंत्रालय, मुंबई
११.निवड नस्ती - सां.का.१